# १७. वस्त्र – आपली गरज

## सांगा पाहू !



खालील चित्रांचे नीट निरीक्षण करा.आपल्याला आवडलेले/हवे असलेले कपडे निवडून त्याभोवती ◯ करा.



आता निवडलेल्या कपड्यांची एकूण संख्या चौकटीत लिहा.

निवडलेल्या कपड्यांची संख्या व तुमच्या मित्रांनी निवडलेल्या कपड्यांची संख्या जुळते का ते पहा.

(१) निवडलेले कपडे कोणकोणत्या दिवशी घालणार आहात ?

(२) दिवसातून किती वेळा कपडे बदलणार आहात ?

(३) निवडलेल्या कपड्यांपेक्षा अजून काही कपडे आपल्याकडे असावेत, असे वाटते का? वाटत असल्यास किती ती संख्या चौकटीत लिहा.

(४) कपड्यांव्यतिरिक्त आणखी कोणकोणत्या वस्तू/दागिने घालायला आवडतील?

(५) तुमचे कपडे तुम्ही मित्रांना घालण्यासाठी द्याल का?

(६) जाहिरातींमधील कोणते कपडे तुम्हांला घालावेसे वाटतात?

---

- आपल्याला अनेक प्रकारचे पोशाख (कपडे) घालायला आवडतात आणि आपल्याकडे ते असावेत असेही आपल्याला वाटते.

## करून पहा.



तुमच्या आसपासच्या परिसरात म्हणजेच रेल्वे स्टेशन, वीटभट्टी, बस स्थानक, माळरान, इत्यादी ठिकाणी निवारा घेणाऱ्यांची भेट घ्या. खालील मुद्द्यांच्या आधारे त्यांच्याशी चर्चा करा व वहीत नोंद करा.

(१) त्यांच्याकडे असलेल्या एकूण कपड्यांची संख्या किती?

(२) उन्हाळ्यात कोणते कपडे घालतात?

(३) हिवाळ्यात कोणत्या प्रकारचे कपडे वापरतात?

(४) पावसाळ्यात कोणते कपडे वापरतात?

(५) सणसमारंभांसाठी कोणते कपडे वापरतात?

(६) दिवसातून किती वेळा कपडे बदलतात?

- वरील कृतीतून तुमच्या काय लक्षात आले?

## सांगा पाहू !



पहिल्यांदा केलेली 'सांगा पाहू' ची कृती आता पुन्हा करा व नव्याने वहीत नोंदवा. हे करत असताना तुमची **गरज** लक्षात घ्या आणि चित्रांतील कपड्यांची निवड करा व संख्या चौकटीत लिहा.

तुमच्या पहिल्या कृतीची उत्तरे व आताच्या कृतीची उत्तरे सारखीच आहेत का?

---

- मुलांनो, या प्रश्नांची उत्तरे मिळाल्यावर असे वाटेल, की आपल्याला हव्याशा वाटणाऱ्या कपड्यांची संख्या जास्त आहे. कपडे हवे असणे आणि त्यांची खरोखरच गरज असणे या दोन्ही भिन्न बाबी आहेत. गरज नसताना वस्तू हव्या आहेत असे वाटणे, हा आपला हव्यास असतो.

आपण प्रसार माध्यमांद्वारे कपड्यांच्या विविध जाहिराती पाहतो आणि त्याकडे आकर्षित होतो. अशा प्रकारे वस्तूंबद्दल निर्माण होणारे आकर्षण आपल्या हव्यासामध्ये भर घालते.

कपड्यांची गरज आणि हव्यास –वर्गात चर्चा करा.

## जरा डोके चालवा.




रोहन आणि सानिया यांच्याकडे खूप कपडे आहेत. त्यांपैकी बऱ्याच कपड्यांचा ते वापर करत नाहीत. या कपड्यांचे आता काय करावे, असा प्रश्न त्यांना पडला आहे. तुम्ही त्यांची समस्या सोडवण्यास मदत करा.




### करून पहा.

**शिक्षकांसाठी सूचना :** ही कृती करून घेण्यासाठी विद्यार्थ्यांसह जवळच्या वस्त्रोद्योग केंद्रास भेट द्यावी अथवा तेथील कुशल कामगाराला मुलाखतीसाठी बोलवावे.



**हातमाग**



**सूत कातणे**

तुमच्या परिसरात उपलब्ध असलेल्या वस्त्रनिर्मितीच्या एका उद्योगाला भेट द्या अथवा मुलाखतीसाठी तेथील कुशल कामगाराला बोलवा. या उद्योगाची माहिती पुढील मुद्द्यांच्या आधारे मिळवा.

१. हा उद्योग कोणता आहे?

२. या उद्योगातून निर्माण होणारे उत्पादन कोणते?

३. वस्त्रनिर्मितीसाठी कोणता कच्चा माल वापरतात?

४. कच्चा माल कोठून आणला जातो?

५. कच्च्या मालाचे स्वरूप काय असते?

६. तयार होणारे उत्पादन विक्रीसाठी कोठे पाठवले जाते?

७. या वस्त्रांचा वापर कोणत्या ऋतूमध्ये करतात?

८. या उद्योगासाठी कोणकोणत्या प्रकारचे कामगार लागतात?

९. हे कामगार कोठून उपलब्ध होतात?

१०. आता वस्त्रोद्योगात पूर्वीपेक्षा कोणकोणते बदल झाले आहेत?


११. या उद्योगात तुम्हांला येणाऱ्या समस्या कोणत्या ?

---

आपण वरील मुद्द्यांच्या आधारे वस्त्रोद्योगाची माहिती मिळवली. आता आपण महाराष्ट्र राज्यातील वैशिष्ट्यपूर्ण वस्त्रनिर्मितीची उदाहरणे पाहूया. पैठणची पैठणी, येवल्याची साडी, औरंगाबादच्या हिमरू शाली, सोलापूरची चादर, इचलकरंजीचे हातमाग व यंत्रमागावरील कापड इत्यादी.

पुढील पृष्ठावरील नकाशाच्या आधारे हे आपल्या लक्षात येईल.

आपल्याला माहीत असलेला परंतु नकाशात न दाखवलेला वस्त्रोद्योग या नकाशाच्या सूचीत लिहा व नकाशात योग्य ठिकाणी दाखवा.




## माहीत आहे का तुम्हांला ?



लखनवी चिकन, काश्मिरची सिल्क, बनारसी सिल्क, कडियल, पितांबरी, पोचंपल्ली, नारायणपेठ, कांजीवरम , पटोला, म्हैसूर सिल्क असे साड्यांचे अनेक प्रकार आहेत. देशाच्या वेगवेगळ्या भागांतील या साड्या आपल्याकडील विविधता दाखवतात.

## करून पहा.

वस्त्रांतील विविधता जाणून घेण्यासाठी पालकांबरोबर कापड बाजारात जा. तेथे असलेल्या लोकांशी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे चर्चा करा व वहीत नोंदवा.

१. वस्त्रांचे विविध प्रकार पहा व त्यांच्या नावांची यादी करा.




२. या यादीचे बाल, तरुण आणि वृद्ध अशा वयोगटांनुसार वर्गीकरण करा.

३. वस्त्रांपैकी साड्यांचे विविध प्रकार जाणून घ्या.

४. साड्यांच्या निर्मितीची प्रसिद्ध ठिकाणे नोंदवा.

५. तुम्ही नोंदवलेल्या साड्यांच्या नावांमधील ठिकाणे व प्रदेश लक्षात घेऊन त्याची नोंद वरील नकाशात करा.

प्रदेशांनुसार साड्यांच्या प्रकारांत अनेक पर्याय दिसतात. यावरून असे लक्षात येते, की आताच्या स्थितीत आपल्याला वस्त्रांचे विविध प्रकार उपलब्ध आहेत. हवामानाच्या विविधतेमुळे व वाहतुकीच्या सुविधांमुळे वस्त्रांमध्ये आपल्याला अनेक प्रकार उपलब्ध झाले आहेत. वस्त्रांमधील विविधता ही आपल्या देशाच्या विविधतेचा एक भाग आहे.

### करून पहा.

तुमच्या घरातील/परिसरातील वयस्कर व्यक्तींना भेटून खालील माहिती घ्या.

- त्यांच्या लहानपणी ते कोणकोणते कपडे वापरत होते?
- त्यांनी सांगितलेल्या कपड्यांची यादी करा.
- ही यादी घेऊन कपड्यांच्या दुकानात जा व तेथे त्यांपैकी कोणते कपडे उपलब्ध आहेत ते पहा.
- तुमच्या यादीतील कोणकोणते कपडे त्या दुकानात मिळतात याची माहिती घ्या.
- कोणते कपडे आता वापरले जात नाहीत ते शोधा.
- हे कपडे कोणत्या ठिकाणावरून येत होते याची माहिती घ्या.
- तसेच त्यांचा वापर का बंद झाला हे जाणून घ्या.

– परंपरेनुसार व काळानुसार वस्त्रांमध्ये बदल होत गेले आहेत का, हे जाणून घ्या.

### माहीत आहे का तुम्हांला ?


मानवाच्या उत्क्रांतीदरम्यान त्याच्या शरीरामध्ये अनेक बदल होत गेले. शरीरावरील केसांचे प्रमाण कमी होते गेले, हा त्यांपैकीच एक बदल होय. शरीरावरील केसांचे आवरण कमी झाल्याने मानवाला ऋतुबदलांपासून संरक्षणाची आवश्यकता भासू लागली आणि त्यातून वस्त्र ही गरज निर्माण झाली. मानवाने विविध काळांत वापरलेल्या वस्त्रांमध्ये विविधता दिसून येते. आदिम काळात सुरुवातीला मानव वस्त्र वापरत नसे. त्यानंतर झाडांची सालं व पाने वापरली जाऊ लागली. पुढे तो शिकार करून मारलेल्या जनावरांचे कातडे वापरू लागला. कापसासारख्या वनस्पतींपासून सूत तयार करण्याची कला अवगत झाल्यावर सुती कापडाचा वापर होऊ लागला. खालील चित्रांवरून हे तुमच्या लक्षात येईल.

### हे नेहमी लक्षात ठेवा.

निसर्गाने प्रत्येकाची गरज भागेल एवढे दिले आहे, परंतु निसर्ग माणसाचा हव्यास मात्र पूर्ण करू शकत नाही. मनुष्याने आपल्या गरजांना प्राधान्य दिले पाहिजे. तरच निसर्ग आपल्या सर्वांचा सांभाळ करू शकेल.

### माहीत आहे का तुम्हांला ?

मुंबई हे कापड गिरण्यांसाठी जगातील प्रसिद्ध ठिकाण होते. या बेटावर दमट हवामानामुळे लांब धाग्याचे कापड तयार करणे सुलभ होते. त्यामुळे मुंबई हे कापड उद्योगाचे मोठे केंद्र बनले. कापड उद्योगाच्या भरभराटीमुळे भारताच्या विविध प्रदेशांतून रोजगारासाठी येऊन या ठिकाणी लोक स्थायिक झाले. तेव्हापासून मुंबई हे भारतातील आर्थिक घडामोडींचे महत्त्वाचे केंद्र बनले.



**वस्त्रांमध्ये काळानुरूप झालेले बदल**

## जरा डोके चालवा.



हवामानातील बदलानुसार वेगवेगळ्या प्रदेशांत वापरण्यात येणाऱ्या कपड्यांमध्ये बदल होतात. जम्मू-काश्मीर, राजस्थान, महाराष्ट्र व केरळ या राज्यांत वापरल्या जाणाऱ्या पोशाखांची चित्रे मिळवा. त्याआधारे तेथील हवामानाविषयी वर्गात चर्चा करा.

## आपण काय शिकलो ?



- वस्तूंची गरज नसताना त्या हव्याशा वाटणे याला 'हव्यास' असे म्हणतात.
- गरजेनुसार वस्तूंचा वापर करावा.
- आपल्या देशातील विविध प्रदेशांना वैशिष्ट्यपूर्ण वस्त्रनिर्मितीची परंपरा आहे.
- देशातील वस्त्रांमधील विविधता नकाशाच्या साह्याने समजून घेतली.

## स्वाध्याय

१. **खालीलपैकी ज्या वस्तू तुमच्याकडे असाव्यात असे वाटते, त्या वस्तूंची नावे वहीत लिहा.**
(१) पाण्याची बाटली (२) चेंडू (३) गोट्या (४) लॅपटॉप (५) फ्लॉवरपॉट (६) मोबाइल (७) सायकल (८) स्कूटर (९) फोटोफ्रेम (१०) जेवणाचा डबा
यांपैकी कोणत्या वस्तू तुम्ही स्वतः वापरणार आहात ?

२. **पारंपरिक वेशभूषेच्या स्पर्धेसाठी तुम्ही कोणकोणत्या कपड्यांची निवड कराल, त्याची नोंद वहीत करा.**

३. **खालील तक्त्यात आपल्या देशातील काही राज्यांची नावे दिलेली आहेत. तेथील प्रसिद्ध वस्त्रांचा प्रकार तक्त्यात लिहा.**

| राज्याचे नाव | वस्त्र |
|---|---|
| महाराष्ट्र | |
| ओडिशा | |
| पश्चिम बंगाल | |
| कर्नाटक | |
| गुजरात | |
| पंजाब | |

**उपक्रम**

(१) जवळपासच्या कपड्यांच्या प्रदर्शनाला भेट द्या. तेथे मांडलेल्या कपड्यांच्या उपयुक्ततेबद्दल अधिक माहिती मिळवा.
(२) तुमच्या परिसरात असणाऱ्या खादी ग्रामोद्योग केंद्राला भेट द्या. कपड्यांचे प्रकार व ते तयार होण्याची ठिकाणे कोणती ते समजून घ्या.

* * *

68PR4B